# नागपुर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपुर.


दिनांक 01/06/2020 (सोमवार)

(दुपार)

## रेती चोरी करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

पो.स्टे. खापा :– अंतर्गत मौजा सिरोंजी सुरेवानी पांधन रस्ता येथे दिनांक 30/05/2020 चे 21.15 वा. दरम्यान विना क्रमांकाचा ट्रॅक्टार व ट्रॉलीचा चालक याने त्याचा मालक नामे– आकाश होटेलाल बाजनघाटे, रा. सिरोंजी याच्या सांगण्यावरून त्याच्या ताब्यातील वाहनात विनापरवाना अवैधरित्या 1 ब्रास रेती किं. 2,000/– रू. रेती भरून वाहतुक करतांना दिसून आला. वाहनासह एकुण 5,02,000/–रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– अनिल महादेव मोरे, वय 28 वर्ष, रा. महालक्ष्मी नगर, सावनेर मंडळ अधिकारी बडेगाव यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापा येथे आरोपीविरुध्द कलम 379, 109 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहा. फौ. दिपक मानटकर हे करीत आहे.

## दुखापत

पो.स्टे. कळमेश्वर :– अंतर्गत 8 कि. मी अंतरावर मौजा गोवारी शिवार येथे दिनांक 31/05/2020 चे 14:00 वा. दरम्यान आरोपी नामे– ज्ञानेश्वर रामाजी धुर्वे, रा. नांदागोमुख याने घर खर्चा साठी त्याच्या वडिल नामे– रामाजी धुर्वे, रा. नांदागोमुख यांना पेसे मागितले असता वडिलांनी पैसे न दिल्याने आरोपीने लोखंडी विळा घेउन वडिलांना मारायला आला असता फिर्यादी नामे– पदमाकर रामाजी धुर्वे, वय 31 वर्षे, रा. नांदागोमुख हे मध्यस्ती गेले असता त्यांचे डोक्याचे डाव्या भागावर लोखंडी विळयाने मारहाण करून जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम 324 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. यातील आरोपीला अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार अमर झिने 8180975125 हे करीत आहे.

## विनयभंग

पो.स्टे. बोरी :– दि. 31/5/20 चे 22:00 वा. चे सुमारास 28 वर्षीय पिडीत/फिर्यादी हिला आरोपी नामे– अमोल मूरलीधर ठाकरे, वय 32 वर्ष, रा. वाकेश्वर याने अंधाराचा फायदा घेत पीडितेस मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. बोरी येथे आरोपीविरुध्द कलम 354 (अ)(1) भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास मपोउपनि आरती उघडे या करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर